# डॉ.आंबेडकरांचा गौरव–संघाची मजबुरी.

कॉ.भीमराव बनसोड,
ट्रेड युनियन सेंटर, कोतवालपूरा,
औरंगाबाद,मो.७५८८१६५१८७
इमेल– bhimraobansod@gmail.com

राज्यात व केंद्रात सत्तेत असलेल्या आर.एस.एस.संचालित भाजप सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष अत्यंत धुमधडाक्यात साजरी करणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यासाठी केंद्र सरकार १२५ रूपयाचे खास नाणे चलनात आणणार आहे. या नाण्याच्या एका बाजुवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे चित्र छापणार आहेत. १९२० साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर राहत असलेले लंडनमधील घर नुकतेच महाराष्ट्र सरकारने विकत घेतले असून विदेशातील ते त्यांचे स्मारक करणार आहेत. पंतप्रधान मोदी ऑक्टोबरमध्ये मुंबई येथील इंदु मिलमधील त्यांच्या स्मारकाचे भुमिपूजन करणार आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जपान येथे जाउन कोयासन विद्यापिठात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे अनावरण करून ही गौरवाची व अभिमानाची बाब असल्याचे सांगितले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जवळून संबंध आलेल्या ठिकाणांना पर्यटनस्थळे म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आर.एस.एस. यांचे आर्थिक, सामाजिक व धार्मिकही विचार परस्परविरोधी असतांना या दोन्ही सरकारांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा इतका पुळका का बरे आला असावा?

आर.एस.एस.संचालित भाजपसह त्यांचा संपूर्ण परिवार हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित राज्य घटनेचा पुरस्कर्ता नाही, विरोधकच आहे. घटनेचे प्रारूप तयार होतांना महिलांना हक्क देणाऱ्या हिंदु कोड बिलावरून या परिवाराच्या संघटनांनी जाहीरपणे विरोध केला. या कारणावरून बाबासाहेबांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. 'राज्य घटना' हा या परिवाराचा आदर्श ग्रंथ नसून चातुवर्ण्याचा पुरस्कार करणारी 'भगवत् गिता' राष्ट्रग्रंथ करायचा विचार त्यांनी बोलून दाखविला आहे. डॉ.आंबेडकरांनी विषमताधारित हिंदु धर्माचा त्याग करून समताधारित बौद्ध धर्मात त्यांच्या लाखो अनुयायासह प्रवेश केला. संघ परिवार राबवित असलेल्या 'घर वापसी'च्या आताच्या वातावरणात तर तो 'धर्मद्रोह'च ठरतो. हिंदु धर्मावर तर्कशुद्ध टिका करून डॉ.आंबेडकरांनी 'रिडल्स इन हिंदुइझम' लिहिले. त्यावर आताच्या सत्तेत सहभागी असलेल्या शिवसेनेने किती काहूर माजविले होते हे सर्वज्ञात आहे. हिंदु धर्माच्या विरोधात डॉ.बाबासाहेबांचे विचार असल्याने गुजराथ सरकारने त्यांचे अभ्यासक्रमातील पुस्तक नुकतेच वगळले आहे. समाजातील मागासवर्गीयांना दिल्या जाणाऱ्या सर्व क्षेत्रातील राखीव जागांचे जनक निर्विवादपणे डॉ.बाबासाहेब आंबेडकरच आहेत आणि या राखीव जागांचे कट्टर विरोधक संघ परीवार आहे, हेही निर्विवाद आहे. आताच्या संघप्रमुख मोहन भागवतांच्या विधानावरून त्याची पुष्टी होते. भारताला 'हिंदु राष्ट्र' बनविणे हे या परिवाराचे ध्येय आहे तर भारत 'धर्मनिरपेक्ष' राहावा यासाठी बाबासाहेबांनी प्रयत्न केले आहेत. याप्रमाणे संघ परिवाराच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय इत्यादी बाबतीत कट्टर विरोधक असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा गौरव करावा, अशी कोणती मजबुरी संघावर आली आहे?

हे खरे आहे की, राज्यच नव्हे देशपातळीवरसुद्धा जनमनाचा ठाव घेउ शकेल असे कोणतेच व्यक्तिमत्व संघ परीवाराकडे नाही. म्हणून त्यांना वेळप्रसंगी कॉंग्रेसचेच असलेल्या वल्लभभाई पटेलांचा आसरा घ्यावा लागतो. स्वच्छ भारत अभियानसाठी, त्यांच्या 'हिंदु राष्ट्रा'च्या विरोधी असलेल्या महात्मा गांधीच्या चष्म्याचाच आधार घ्यावा लागला. केंद्रात व राज्यात सत्तेत आले पण सत्तेची स्थाने असलेल्या विविध संस्थावर वकुब असलेली मान्यताप्राप्त माणसे त्यांच्याकडे नाहीत. म्हणून भारतीय इतिहास अनुसंधान संस्थेच्या अध्यक्षपदी प्रा.सुदर्शन यांची तर एफ.टी.आय.आय. सारख्या संस्थेवर गजेंद्र चव्हाण सारख्या सुमार माणसाची नेमणूक करावी लागली. त्यामुळे त्यांनी संपूर्ण देशातील कलाप्रेमिंचा रोष ओढवून घेतला. इतिहास, कला, साहित्य इत्यादी सर्व क्षेत्रात त्यांना ही वाणवा जाणवते. येथे त्याच्या कारणात जाण्याचे काही कारण नाही. थोडक्यात काय तर त्यांच्याकडे थोर व्यक्ति, महनीय नेते, सर्वमान्य विचारवंत, इतिहास संशोधक नाहीत, ही त्यांची अडचण आपण समजू शकतो. पण तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या कट्टर विरोधकाचा इतका देशव्यापी गौरव करावा, याचे इंगित काय असावे?

एकतर देशव्यापी मान्यता असलेले महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरूसारख्या नेत्यांचे महत्त्व काळाच्या ओघात कमी होत आहे. कारण या नेत्यांनी जो प्रश्न हाती घेतला होता तो भारतीय स्वातंत्र्याचा होता. त्या स्वातंत्र्य चळवळीमुळेच ते मान्यता पावले होते. पण आता इंग्रज भारतातून गेले आहेत. कसे का होईना देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे. त्यामुळे आता नामस्मरणाशिवाय त्यांचा फारसा उपयोग नाही. पंडित नेहरूंचे महत्त्व या चळवळीबरोबरच ते स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून त्यांनी जे मिश्र अर्थव्यवस्थेचे धोरण घेतले होते, तेही आताच्या जागतिकीकरणाच्या जमान्यात अडगळीत टाकण्यासारखेच झाले आहे. म्हणून त्या धोरणाचे जनक नेहरूही अडगळीत पडले तर नवल नाही.

पण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जो प्रश्न हाती घेतला होता तो केवळ अस्पृष्यतेचा नव्हे तर भारतीय जातीव्यवस्थेचा गहण व कठीण प्रश्न होता, जो अजूनही सुटलेला नाही. उलट आणखी तीव्र होत आहे. शिक्षणामुळे शोषित जातीतील जागृती जसजसी वाढत आहे, तसतसी माणूस म्हणून स्वाभिमानाने जगण्याच्या, सामाजिक न्यायाच्या, आर्थिक समतेच्या, धार्मिक स्वातंत्र्याच्या मुळाशी असलेल्या जातीयप्रश्नांची तीव्रताही वाढत आहे. त्याबाबत देशभरातील संघर्षही वाढत आहेत. असं नाही की हा प्रश्न पहिल्यांदा फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच घेतला होता. त्यांच्याही पूर्वी महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, रामस्वामी पेरीयार यासारख्या नेत्यांनाही त्याचे श्रेय जातेच. पण या सर्वांपेक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा परीघ मोठा होता. या प्रश्नासाठी त्यांनी केलेले संघर्ष, चालविलेली वर्तमानपत्रे, केलेले प्रचंड लिखाण, विविध ठिकाणची भाषणे, इंग्रजांशी वाटाघाटी, कॉंग्रेस व महात्मा गांधींशी वादविवाद, मंत्रीमंडळातील सहभाग व त्याचे राजीनामे, राज्यघटना निर्मितीतील मोठा सहभाग, महिला, दलित व मागासवर्गीयांच्या हक्कासाठी केलेला आटापिटा व सर्वात शेवटी लाखोंच्या संख्येने धर्मांतर करून हिंदुत्ववाद्यांना दिलेला प्रचंड तडाखा. यामुळे येथून पुढे होणाऱ्या याबाबतच्या संघर्षाचे मार्गदर्शक व लढ्याचे प्रतिक डॉ.बाबासाहेब आंबेडकरच रहाणार आहेत. त्यांचे विचार हे मानवी स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाचे असल्याने वैचारिक पातळीवर त्यांच्याशी विषमतावादी संघ परीवार मुकाबला करू शकत नाही. तेंव्हा अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे काय करायचे, असा मोठा गहन प्रश्न भाजप व संघ परीवारापुढे आहे.

डावपेच म्हणून त्यांनी निवडलेला मार्ग असा की, एकीकडे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा उदोउदो करायचा. जनमाणसात आपले स्थान बळकट करण्यासाठी त्यांच्या नावाचा वापर करायचा पण दुसरीकडे अभ्यासक्रमातील त्यांचे धडे काढून टाकायचे. त्यांच्या विचारांना प्रसृत न करता, जमल्यास ते संदर्भहीन व विकृत करायचे त्यांनी ठरवलेले दिसते. अशा कामी त्यांनी विविध आमिषे दाखवून मागासवर्गीयातील काही राजकीय पुढारी, तथाकथिम विचारवंत, लेखक, बुद्धीजिवी व बडे नोकरशहा हाताशी धरले आहेत. 'समरसता मंच' नावाची त्यांची संघटना हे काम पूर्वीपासून करीत असली तरी आता सत्ता हाती आल्याने तिला जरा जास्तच धुमारे फुटले आहेत. पण कोण्या दगडी स्मारकात व धातुच्या पुतळ्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार बंदिस्त रहातील इतके ते कमकुवत निश्चितच नाहीत. दलित, शोषित, पिडित जनतेच्या कृतीचा ठाव ते घेणारच आहेत.

— — — ००० — — —